# वास्तविक शांतता इस्लामी शिकवणींच्या प्रकाशात

भाषण

हज़रत मिर्ज़ा मसरूर अहमद साहिब
ख़लीफ़तुल मसीह खामिस अय्यदहुल्लाहु तआला बिनस्त्रिहिल अज़ीज़



# वास्तविक शांतता

## इस्लामी शिकवणींच्या प्रकाशात

भाषण
हज़रत मिर्ज़ा मसरूर अहमद
अपेक्षित मसीहाचे पंचम खलीफा
(अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक असो)

अनुवादकः
खान मामून अहमद एतेज़ाज़
(मुरब्बी सिलसिला, एम.ए.मराठी),
प्रमुख मराठी विभाग

मुद्रण :
फजले उमर प्रिंटींग प्रेस,
कादियान, भारत.

# (حقیقی امن اسلامی تعلیمات کی روشنی میں)

Address
By
Hazrat Mirza Masroor Ahmad
Khaliftul Messiah V (abt)
Urdu

**Marathi Translation**
Vastavik Shannta
Islami Shikvanichya Prakashaat
By
Khan Mamoon Ahmed Etyzaz
(Murabbi, M.A.,Incharge Marathi Desk)


First Edition : 2023
Copies : 500
Printed at : Fazl-e-Umar Printing Press Qadian
Published by : Nazarat Nashr-o-Isha'at,
Sadr Anjuman Ahmadiyya Qadian
Dist: Gurdaspur, Punjab, India,143516


अधिक माहितीसाठी संपर्क करा


www.alislam.org
www.ahmadiyyamuslimjamaat.in
Toll Free No: 1800-103-2131

# वास्तविक शांतता इस्लामी शिकवणींच्या प्रकाशात

(वार्षिक सम्मेलन अहमदिया मुस्लिम जमाअत जर्मनी २०२२ च्या समापन सत्रात)

सय्यदना हजरत मिर्ज़ा मसरूर अहमद, अपेक्षित मसीहाचे पंचम खलीफा,

(अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक होवो),

यांचा हृदयस्पर्शी आणि अद्भूत भाषण

(दि. २१ ऑगस्ट २०२२, रविवार, स्थान ऐवान-ए-मसरूर, इस्लामाबाद, टिलफोर्ड, यु.के.)

**जोपर्यंत एक उच्च अस्तित्वाला स्वीकारत नाही तोपर्यंत खरी शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही......सर्वशक्तिमान अल्लाहच शांतीदाता आहे हा विश्वास केवळ इस्लामनेच पवित्र प्रेषित मुहम्मद (स.)द्वारे प्रस्तूत केले आहे.**

**''हे युरोप! तुही सुरक्षित नाही आणि हे आशिया तु देखील ही सुरक्षित नाही. आणि हे बेटांतील रहिवासींनो! कोणताही कृत्रिम देव तुमची सहाय्यता करणार नाही. मी शहरांना पडताना आणि वसाहतींना नष्ट होताना पाहत आहे.'' (हजरत अपेक्षित मसीह)**

**अशा स्थितीत जर कोणी आशेचा किरण आहे, शांततेची हमी आहे, तर तो एकमेव अस्तित्व ज्याला सर्वशक्तिमान अल्लाहने शांतता आणि सुरक्षिततेची शिकवण देऊन जगामध्ये धाडले होते, जो शांतीचा सम्राट आहे, जो सर्व मानवांपेक्षा अल्लाहला प्रिय आहे, ज्यावर सर्वशक्तिमान अल्लाहने शेवटची परिपूर्ण आणि शरीयत (धर्मग्रंथ) प्रकट केली, ज्यामधील शिकवणी प्रेमाने व्यापलेली आहे.**

खरी शांतता तेव्हाच स्थापित होईल जेव्हा वैयक्तिक, कौटुंबिक, जातीय, राष्ट्रीय आणि नागरी प्राधान्यांना सोडून, एक मध्यवर्ती केंद्राला साधून करण्याचा प्रयत्न केला जाईल. आणि हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा मनुष्यामध्ये ही चेतना आणि भावना निर्माण होईल की माझ्यावर सुद्धा एक महाशक्ति आहे जी फक्त माझ्यापूर्ते नव्हे तर संपूर्ण जगासाठी शांती इच्छिते.

सर्वशक्तिमान अल्लाहने आपला प्रकाश, जो की, पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) आहेत आणि पवित्र कुरआन, जो की उज्ज्वल ग्रंथ आणि तमाम ज्ञान व तज्ज्ञांचा स्त्रोत आहे, यांना पाठवून मानवतेवर एक मोठा उपकार केला आहे. त्याचा लाभ न घेता माणूस आपल्या विध्वंसक स्वार्थाच्या कैदेत राहिला तर यापेक्षा मोठे दुर्दैव काय असू शकते?

पवित्र प्रेषिताच्या सच्च्या दासासोबत जुडणे देखील अति महत्त्वाचे आहे. तेव्हाच ज्ञान आणि अध्यात्मविद्येचे योग्य आकलन होऊ शकते.

आज हे कार्य अपेक्षित मसीहाच्या जमाअतला सोपवण्यात आले आहे. आम्ही प्राथमिक पातळीपासून (घरापासून) ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत आपली भूमिका पार पाडली नाही, तर शांती आणि सुरक्षिततेने जगण्याची हमी मुळीच नाही.

आमच्या विरोधकांना वाटेल ते विचार करू द्या. आमचे कार्य आहे की, आम्ही जर पवित्र प्रेषितावर खरे प्रेम करत असेल तर पवित्र पैगंबरांच्या शिकवणींचा अवलंब करून त्यांचा जगात प्रसार करावे आणि जगाला सांगावे की आज जगात शांतता आणि

सुरक्षिततेसाठी हाच एकमेव उपाय आहे. म्हणून, याकडे धाव घ्या आणि शांतता आणि सुरक्षितता शिकवणाऱ्या या महान व्यक्तीशी संपर्क जुळवून इहलोक व परलोकात सुखाचे आनंद घ्या.

जोपर्यंत लोकांमध्ये खरी एकता आणि बंधुता निर्माण होत नाही तोपर्यंत शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही आणि खरीखुरी बंधुता आणि एकता एक विधात्यावर विश्वास ठेवल्याशिवाय निर्माण होऊ शकत नाही.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर प्रकट झालेल्या परिपूर्ण शरियतमध्ये नमूद असलेल्या शिकवणींच्या प्रकाशात वास्तविक आणि चिरस्थायी जागतिक शांतता प्रस्थापित करण्याबद्दल एक अंतर्दृष्टीपूण व्याख्यान.

जमाअतच्या सदस्यांनी इस्लामिक शिकवणींनुसार अंमलबजावणी करून जगासमोर एक चांगले उदाहरण प्रस्तूत करण्याचे आवाहन

أَشْهَدُ أَنْ لَّا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهٗ لَا شَرِيْكَ لَهٗ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَ رَسُوْلُهٗ۔ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔ بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ ﴿۱﴾ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿۲﴾ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ ﴿۳﴾ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ ﴿۴﴾ إِيَّاكَ نَعْبُدُ وَ إِيَّاكَ نَسْتَعِيْنُ ﴿۵﴾ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ ﴿۶﴾ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ ۙ۬ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ ﴿۷﴾

अल्लाहची कृपा व दया आहे की, सद्या जगात घातक परिस्थिती असतानाही अहमदिया मुस्लिम जमाअत जर्मनीला त्यांचे वार्षिक सम्मेलन आयोजित करण्याचे सौभाग्य प्राप्त होत आहे आणि गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी तुम्ही या संमेलनाचे व्यापक नियोजन करत आहात. आधी कोविड (Covid) महामारीने जगाला चिंतित केले आणि अद्याप ही महामारी संपलेली नाही की आता जगातील युद्धांच्या परिस्थितीने जगाला अत्यंत धोकादायक वळणावर आणले आहे. या अपेक्षित आपत्तीपासून जगातील कोणताही प्रदेश सुरक्षित दिसत नाही **जोपर्यंत एकमेव परमेश्वराकडे वळत नाहीत तोपर्यंत या विनाशापासून सुरक्षित राहू शकत नाहीत.**

युद्धांची परिस्थिती, अराजकतेची परिस्थिती, प्रदेश आणि देशांच्या विध्वंसाची परिस्थिती निर्माण होत आहे किंवा घडत आहे आणि आम्ही त्यापासून हजारो मैल दूर असल्यामुळे त्याच्या सर्व परिणामांपासून आम्ही सुरक्षित आहोत, असा विश्वास प्रथम युरोप आणि पाश्चात्य

देश आणि विकसित देश घेऊन बसले होते. परिस्थिती बिघडत आहे, बॉम्बस्फोट होत आहेत, माणसे मरत आहेत, स्त्रिया विधवा होत आहेत, मुले अनाथ होत आहेत, माणसे अपंग होत आहेत, हे सर्व आशिया आणि मध्यपूर्वे आणि गरीब देशांत घडत आहे, आम्हाला त्याची चिंता करण्याची काय गरज? विकसित देश या देशांना शस्त्रास्त्रे पुरवत होते आणि हे समजत होते की आमची शस्त्रे विकली जात आहेत. ते मरत असेल तर मरू द्या, आम्हाला त्यांचा काय? पण ही परिस्थिती त्यांच्यावरही येऊ शकते हे ते विसरून बसले आहेत आणि प्रगतीच्या नादात त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे आणि डोळे नेत्रहीन झाले आहेत. **आता संपूर्ण जग पाहत आहे की जो धोका अपेक्षित होता आता घडत आहे आणि आता युरोपातही युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.** युक्रेनमुळे रशिया आणि नॉटो देश समोरासमोर उभे आहेत. शेवटी कोणाला वर्चस्व प्राप्त होईल किंवा दोन्ही बाजूंना किती नुकसान सोसावे लागेल हे परमेश्वरच जाणतो, पण त्याचे परिणाम खूप घातक होतील हे निश्चित आहे आणि जर अजूनही शहाणपणाने वागले नाही तर याचा परिणाम एक भयानक विध्वंस असेल.

मग आपण पाहतो की आता ताईवानचा मुद्दा देखील सक्रीय झालेला आहे आणि हे स्पष्ट आहे की आता संपूर्ण जग एका भयानक युद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. या युगात धाडलेले अल्लाहच्या दूताने अतिशय स्पष्टपणे जाहिर केले होते की,

**''हे युरोप! तुही सुरक्षित नाही आणि हे आशिया तु देखील सुरक्षित नाही. आणि हे बेटांतील रहिवासींनो! कोणताही कृत्रिम देव तुमची सहाय्यता करणार नाही. मी शहरांना पडताना आणि वसाहतींना नष्ट**

**होताना पाहत आहे.**''

(हकीकतुल वही, रूहानी खजाईन, खंड २२, पृष्ठ २६९)

हेच ते विधान, ताकीद आणि चेतावणी आहे ज्याकडे अहमदिया खलीफा वेळोवेळी लक्ष वेधत असतात. मीही याकडे अनेक दिवसांपासून सर्वांचे लक्ष वेधत आहे, असे सांगत आहे की **आपल्या निर्मात्याकडे वळा अन्यथा विनाश निश्चित आहे.** मी खूप दिवसांपासून सांगत आहे की ब्लॉक्स तयार होत आहेत आणि त्याचा अंतिम परिणाम एकमेकांचा नाश अपेक्षित आहे. म्हणून सचेत व्हा; परंतु असंख्य लोक, हे सर्व ऐकून सुद्धा म्हणतात की परिस्थिती वाईट आहे, परंतु तुम्ही चित्रित करत आहात तितके भयानक आणि निराशाजनक नाही. आता या गोष्टींकडे वरवरच्या दृष्टिकोनातून पाहणारे हे लोक असे म्हणू लागले आहेत की परिस्थिती आणखीनच बिकट होत चालली आहे आणि हीच परिस्थिती राहिली तर भयंकर युद्ध कधीही होऊ शकते.

आता या गोष्टी त्यांच्या थिंक टँक (प्रशासनीय अधिकारी) आणि विश्लेषकांनी सांगायला सुरुवात केली आहे, परंतु असे असूनही त्यांच्याकडे शाश्वत शांतता प्रस्थापित करण्याचा उपाय नाही आणि ते संसारात मग्न होऊन धर्म विसरले आहेत म्हणून ते शांततेच्या स्त्रोताकडे पाहण्यापासून वंचित आहेत.

**जिथे शांततेचे उपाय आहे तिथे बिगर मुस्लिम सरकारे येण्यास तयार नाहीत आणि दुर्दैवाने मुस्लिम सरकारे देखील येण्यास सज्ज नाहीत.** काही ठिकाणी विश्लेषक असेही म्हणू लागले आहेत की युद्धांच्या बाबतीत होणारा विनाश इतका भयंकर असेल की एका अंदाजानुसार त्यानंतर दोन वर्षांनी जगातील ६६ टक्के लोकसंख्या, युद्धादरम्यान आणि अण्वस्त्रांच्या वापरामुळे, नष्ट होईल. असा विनाश

आणि विध्वंस होईल ज्याची कोणी कल्पनाही करू शकत नाही. सामान्य माणूस याचा विचारही करू शकत नाही. त्यामुळे खूप भयंकर परिस्थिती निर्माण झाली आहे.

**अशा वेळी जर आशेचा किरण असेल, शांततेची हमी असेल, तर अल्लाहने शांतता आणि सुरक्षिततेची शिकवण देऊन जगाला पाठवलेले एकच अस्तित्व आहे, जो शांतीचा सम्राट आहे; जो सर्व मानवांपेक्षा सर्वशक्तिमान अल्लाहला प्रिय आहे, ज्याच्यावर अल्लाहची शेवटची परिपूर्ण आणि संपूर्ण शरियत उतरली होती, ज्याच्या शिकवणूकींचा गाभा प्रेम आणि आपुलकी आहे.** ज्याने, सर्वशक्तिमान अल्लाहशी असलेल्या त्यांच्या नातेसंबंधामुळे आणि त्यांच्यावर आलेल्या शिकवणीचा जगात प्रसार करण्याच्या चिंतेमुळे आणि जगाला विनाशापासून वाचवण्याच्या चिंतेमुळे आणि त्याच्यासाठी तीव्र वेदना जाणवल्यामुळे, त्यांनी आपले प्राण धोक्यात टाकले होते. आणि स्वतःला इतरांची चिंता करण्यात आणि सर्वशक्तिमान अल्लाहकडे त्यांच्यासाठी प्रार्थना करण्यात इतके वाहून दिले की अल्लाह ने स्वतः त्यास संबोधले की,

لَعَلَّكَ بَاخِعٌ نَّفْسَكَ اَلَّا يَكُوْنُوْا مُؤْمِنِيْنَ

अर्थात-ते लोक श्रद्धा ठेवीत नाहीत म्हणून कदाचित तू स्वतःशी दुःख करीत मरून जाशील. (अश्-शुअरा-४)

तर हा तो अस्तित्व ज्याच्या हृदयात मानवतेसाठी वेदना होती की, लोकांनी त्यांच्या निर्मात्याकडे लक्ष वेधावे आणि विनाशापासून वाचले जावे. आणि इहलोक व परलोक दोन्ही जगात स्वतःला सुरक्षित करावे. त्यांनी इतके सर्वसमावेशक शिक्षण दिले की इतर कोणतेही

शिक्षण त्याच्याशी स्पर्धा करू शकत नाही. अशा शांततेची हमी दिली, जी खरं तर अल्लाहने दिलेली हमी आहे; **परंतु दुःखद गोष्ट अशी की मुस्लिमांनी ही शिकवण विसरून फक्त नाममात्र श्रद्धाचे शाब्दिक घोषणाबाजी करून एकमेकांच्या कट्टर वैरी झाले आहेत आणि यासाठी (आपल्या बांधवांचा वध करण्यासाठी) ते इतरांची मदत घेत आहेत.**

कलमा (ला इलाहा इल्लल्लाह) म्हणणारे दुसऱ्या कलमा म्हणणाऱ्याला, विरोधींच्या सहाय्याने कत्तल करत आहेत. यापेक्षा मुस्लिमांचे दुर्दैव काय असू शकते? एवढी सुंदर शिकवण आणि इतकी वेदना सोसणाऱ्या प्रेषिताचे अनुयायी असण्याचा दावा केल्यानंतर परमेश्वराची नाराजगी प्राप्त करत आहेत आणि जगात शांती आणि सौहार्द पसरवण्याऐवजी अशांतता प्रसारित करणारे म्हणून प्रसिद्ध होत आहेत आणि हे सर्व घडण्याचे कारण एवढेच की, ज्या सेवकाला परमेश्वराने या युगात शांती आणि सौहार्द प्रस्थापित करण्यासाठी धाडले आहे, त्याच्या उपदेशांपासून दृष्टीआड केले गेले आणि केवळ दृष्टीआड नव्हे तर त्याला आणि त्याच्या अनुयायांना 'काफिर'चा फतवा लावण्यात आले आणि त्यांना ठार मारण्याला, इस्लामची सेवा आणि पवित्र पैगंबर हजरत मुहम्मद मुस्तफा (स.) यांच्यावरील प्रेमाचे मानक संबोधण्यात आले. अहमदी लोकांच्या जीवाशी खेळणे हा त्यांचा सर्वात मोठा पुरस्कार आहे. मग असे लोक इस्लामची शातंतेची शिकवण जगात कशी पसरवू शकतात?

**परमेश्वर त्यांना अक्कल देवो. त्यांचे मौलवी, दुष्ट मौलवी बनण्याऐवजी, ज्ञान आणि सुसंकार पसरवणारे विद्वान बनले पाहिजे जेणेकरुन ते एक समुदाय होऊन पवित्र प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या**

**शिकवणूकींचा प्रसार करणारे बनतील, आणि पवित्र पैगंबरांच्या सच्च्या दासासोबत जगभरात खऱ्याखुऱ्या शांतता आणि अपुलकीचा संदेश प्रसृत करू शकतील.**

तथापि, हा एक वेगळा आणि तपशीलवार विषय आहे.

**या वेळी, मी पवित्र प्रेषित मुहम्मद (स.) यांची शिकवण, त्यांच्यावर प्रकट झालेले दिव्यग्रंथ, त्यांच्या शांतीप्रिय शिकवणूकीच्या संदर्भात जागतिक शांततेबद्दल काहीं बोलेन.**

पवित्र प्रेषित (स.) यांची शिकवण आणि त्यांचे आदर्श इतके विपुल आहेत की या अल्पकाळात ते नमूद करणे अशक्य आहे. तरी त्यापैकी काहीं घटना प्रस्तूत करण्याचा प्रयत्न करेन.

**अहमदिया समुदायाबद्दल असे म्हटले जाते की, (अल्लाह क्षमा करो) आम्ही पैगंबर (स.)चा तिरस्कार आणि अपमान करतात आणि अशा करण्याची शिकवण देतात.** पण वास्तविक पाहता आज आम्हीच पवित्र पैगंबर यांच्या शिकवणुकीचे पालन करणारे आणि त्यांच्यावर अपार प्रेम करणारे आहेत. जमाअत अहमदियाचा साहित्य याचा पुरावा आहे. साहित्यातील शिकवण आणि प्रेम पाहून दरवर्षी हजारो सत्कर्मी लोक अहमदिया मुस्लिम जमातमध्ये सामील होतात. बिगर अहमदी देखील असे म्हणण्यास मजबूर होतात की इस्लामची ही शिकवण इतकी प्रभावी आणि प्रेमळ आणि शांतता पसरवणारी आहे की आज जगातील शांततेसाठी हाच एकमेव उपाय आहे.

काही दिवसांपूर्वी, वार्षिक सम्मेलन U.K. मध्ये जमाअतच्या प्रगती अहवालात आणि जलसाच्या अभिप्राय कार्यक्रमांमध्ये, अहमदीं

आणि जलसा सालानाचा त्यांच्यावर कसा परिणाम झाला आणि त्यांना कशा प्रकारे प्रेरणा मिळाली आणि इस्लामची शांततापूर्ण शिकवणूकीचे ज्ञान प्राप्त झाले, याबद्दल मी लोकांची विधाने प्रस्तूत केले होते. तथापि, विरोधी आमच्याबाबत काय विचार करतात काय बोलतात ते त्यांना करू द्या, पण जर आम्ही पवित्र पैगंबर (स.) यांच्यावर खरे प्रेम करत असेल, तर आमचा उद्देश एवढाच असावा की त्यांच्या शिकवणींवर काटेकोरपणे अंमल करावं अणि त्यास जगभरात प्रसारित करावे. जगाला दाखवा की आज जगातील शांतता आणि सुरक्षिततेसाठी हाच एकमेव उपाय आहे. म्हणून या आणि शांतता आणि सुरक्षितता शिकवणाऱ्या या महान व्यक्तीशी संपर्क साधा आणि या जगात आणि परलोकात आपली सुरक्षा करा. हे केवळ शब्दच नाहीत, तर इतिहासाकडे पाहिल्यास या पैगंबराने अशिक्षित आणि अज्ञानी अरबांना अज्ञानाच्या अंधारातून कसे बाहेर काढले आणि त्यांना उच्च नैतिक आणि ज्ञानाच्या बुरुजांवर आणले हे लक्षात येते. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) सांगतात: ''तोच प्रेषित आहे ज्याने रानटींना मानव आणि मानवातून नैतिक मानव बनवले. दुसऱ्या शब्दांत, त्याने खऱ्या आणि वास्तविक नैतिकतेचे केंद्र स्थापित केले आणि नंतर नैतिक व्यक्तीला देव माणूस होण्याच्या दैवी रंगाने रंगवले.''

(मजमुआ इशतेहारात, खंड २, पृष्ठ १८३, मस्तिकनां बुही अल्लाह अल-कहार जाहिराती. नश्रो इशाअत कादियान २०१९ प्रकाशित)

म्हणून पवित्र पैगंबर (स.) त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना आणि त्याच्यावर प्रेम करणाऱ्यांना आचार आणि उपासनेचे नियम शिकवले ज्यामुळे त्यांना सर्वशक्तिमान परमेश्वराच्या जवळ आले आणि त्यांचे प्रत्येक शब्द आणि कृती सर्वशक्तिमान परमेश्वराच्या आनंदासाठी

बनले. सेवकांचे हक्क फेडणे म्हणजे सर्वशक्तिमान ईश्वराच्या जवळ जाणे होय. म्हणूनच, पवित्र प्रेषित (स.) यांचे प्रामाणिक अंतःकरणाने अनुसरण करणे एखाद्या व्यक्तीला अशा टप्प्यावर घेऊन जाते जिथे तो सर्वशक्तिमान अल्लाहचा खरा प्रेमी बनतो आणि हे खरे प्रेम मग व्यक्तीचे प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती सर्वशक्तिमान परमेश्वराची प्रसन्नता प्राप्त करते. ''**हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) खऱ्या अंतःकरणाने पवित्र पैगंबराचे अनुसरण करणाऱ्याबद्दल सांगतातः पवित्र प्रेषित (स.) यांचे प्रामाणिक मनाने पालन करणे आणि त्यांच्यावर प्रेम शेवटी त्याला परमेश्वराचा प्रिय बनवतो.**''

(हकीकतुल वही, रुहानी खजाईन, खंड २२, पृष्ठ ६७)

तर ही एक क्रांती होती जी पवित्र पैगंबर (स.) यांनी लोकांच्या अंतःकरणात निर्माण केली, की जे बहुदेववादी होते ते एकेश्वरवादी झाले आणि असे झाले की ते सर्वशक्तिमान अल्लाहचे प्रिय बनले. ते सर्वशक्तिमान अल्लाहला प्रेम करू लागले आणि सर्वशक्तिमान अल्लाह त्यांच्यावर प्रेम करू लागला. आणि या प्रेमकांनी त्यांचे सर्व हक्कही पूर्ण अदा केले आणि उत्तम रितीने पूर्ण केले. परमेश्वराने दिलेल्या शिकवणींवर पूर्णपणे कायम राहिले आणि एक आदर्श इतरांसाठी कायम केले.

**जेव्हा एखादी व्यक्ती एखाद्यावर प्रेम करते, तेव्हा ते त्याच्या प्रत्येक उक्ती आणि कृतीचे पालन करण्याचा प्रयत्न करते;** केवळ शाब्दिक प्रेमाचा दावा करत नाही. म्हणून, जेव्हा या लोकांमध्ये सर्वशक्तिमान परमेश्वरासाठी प्रेम निर्माण झाले, तेव्हा त्याच्या निर्मितीचे हक्क देण्याकडेही लक्ष निर्माण केले गेले. निर्मितींच्या हक्कांची पूर्तता करण्यात ते एकमेकांना मागे टाकण्याचा प्रयत्न करू लागले. आणि

जेव्हा ही परिस्थिती उद्भवते तेव्हा परस्पर प्रेम आणि आपुलकी देखील निर्माण होते. सर्वशक्तिमान अल्लहाची प्रसन्नता मिळविण्यासाठी मानव इतरांचे हक्क पुरवत असतो आणि जेव्हा हे प्रमाण बनते, तेव्हा शांतता आणि सुरक्षिततेलाही एक पाया असतो, त्यासाठी प्रयत्न केले जातात आणि त्याचे मानक स्थापित केले जातात.

**म्हणून पवित्र पैगंबर मुहम्मद (स.), हेच ते अस्तित्व आहेत ज्याने आम्हाला सर्वशक्तिमान अल्लाहला भेटण्याचे मार्ग दाखववले आणि हेच ते अस्तित्व आहेत ज्यांच्यावर अवतरलेली शिकवणीचे पालन करून आम्ही जगात शांतता आणि सुरक्षितता निर्माण करू शकतो.** हे नेहमी लक्षात ठेवावे की, खरी शांततेची सुरूवात आपलया घरातून सुरु होते. मग त्याची व्याप्ती परिसर, गाव, शहर, देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वाढते. **तर सर्व स्तरांवर जेव्हा एखाद्याच्या भावना आणि हक्कांची काळजी घेतली जाईल तेव्हाच शांतता प्रस्थापित होईल आणि प्रत्येक वर्गासाठी हीच शिकवण सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र पैगंबर (स.) द्वारे आम्हाला दिली आहे.**

हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) वेगवेगळ्या प्रसंगी या विषयाचे स्पष्टीकरण देत असे; परंतु एक ठिकाणी विस्तृतपणे सांगत ते म्हणालेः

''**पवित्र प्रेषित आणि जागतिक शांती**''

त्यांच्या या लेखाचा फायदा घेऊन मी या संदर्भात काही खुलासाही करेन.

आपण हे पाहतो आणि समजतो की शांतता ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. शांततेबद्दल बोलले जाते, प्रत्येकजण म्हणतो की शांतता ही खूप महत्वाची गोष्ट आहे आणि शांततेचे राज्य हे देशामध्ये शांतता

आणि सुरक्षिततेची हमी आहे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील शांतता आणि सुरक्षिततेची हमी आहे आणि त्यांची देखील इच्छा आहे की प्रत्येक स्तरावर शांतता प्रस्थापित होवो; **परंतु केवळ इच्छा, शांतता स्थापन करू शकत नाही, कारण इथेही शांतीची इच्छा स्वार्थी आहे आणि हेच आपण जगात पाहतो.**

स्वार्थ नसेल तर भांडण होऊ शकत नाही. सर्वसाधारणपणे, जेव्हा कोणी शांततेबद्दल बोलतो तेव्हा तो शांततेची इच्छा स्वतःसाठी करतो, किंबहुना सामान्यतः जेव्हा एखादी व्यक्ती प्रार्थना करते आणि प्रार्थना करत नसेल तरीही, एक व्यक्ती असेच म्हणते की हे परमेश्वरा! मला आणि माझी पत्नी, मुले आणि माझ्या नातेवाईकांना सुरक्षित ठेव पण इतरांसाठी ही भावना उमलत नाही, किंवा एखाद्या व्यक्तीला आपले जीवन शांततेने जगण्यासाठी संपत्ती हवी असेल आणि त्याला श्रेष्ठ जाणतो, तर याचा अर्थ असा नाही की तो आपल्या शत्रूसाठीही संपत्ती श्रेष्ठ मानतो, तर केवळ स्वतःसाठी संपत्तीला लाभदायक पाहतो. जर एखाद्याने आरोग्य चांगले मानले तर त्याचा अर्थ असा नाही की एखाद्याला शत्रूसाठी देखील चांगले आरोग्य इच्छितो. शत्रूसाठी, तो गरीब आणि दुर्बल असावा अशी त्याची इच्छा असेल जेणेकरून शत्रूवर त्याला प्रभुत्त्व मिळेल. त्याचप्रमाणे लोकांना आदर आणि सम्मान हवा असेल तर तो स्वतःसाठी; इतरांसाठी नाही. मला मिळत असलेला आदर आणि प्रतिष्ठा इतरांना मिळावी अशी भावना उद्भवत नाही. ही परिस्थिती आपल्याला जगात सामान्य लोकांमध्ये आणि नेत्यांमध्येही दिसते. सत्तेत आल्यानंतर एकमेकांशी भांडणारे आणि एकमेकांवर अत्याचार करणारे राजकारणी, जे आपण आपल्याच देशात

पाहत आहोत, ते एकमेकांविरूद्ध जे काय करत आहेत, ते याच विचारसरणीचा परिणाम आहे. म्हणून जर फक्त शांतता हवी असेल तर ती भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरू शकते; कारण त्यात स्वार्थाचा समावेश आहे कारण ज्यांना शांतता हवी आहे ते अशा प्रकारे शांततेची इच्छा करतात की फक्त त्यांना आणि त्यांच्या नातेवाईकांना किंवा त्यांच्या राष्ट्राला शांती मिळावी. नाही तर, इतरांसाठी आणि शत्रूंसाठी, त्यांची तमा असते की त्यांना शांती न लाभो. म्हणून, जर हे तत्व फक्त स्वतः साठी राखले गेले आणि इतरांपासून परावृत्त ठेवले गेले, तर जगात जी काही शांतता प्रस्थापित होईल, ती काही लोकांची शांतता असेल, जगव्यापत शांतता कायम होणार नाही. **आणि जर संपूर्ण जगात शांतता नसेल तर ती खरीखुरी शांती म्हणण्याचे योग्य नाही. खरी शांतता तेव्हाच असेल जेव्हा ती वैयक्तिक, कौटुंबिक, जातीय, राष्ट्रीय आणि नागरी प्राधान्यांच्या वरती स्थापित करण्याचा प्रयत्न केला जाईल, मध्यवर्ती अक्ष साध्य करण्यासाठी केला जाईल. आणि हे तेव्हा होऊ शकते जेव्हा मनुष्यामध्ये ही जाणीव निर्माण होईल की माझ्या वर देखील एक अत्योच्च शक्ति आहे जी केवळ माझीच नव्हे तर संपूर्ण मानवजातीची शांतता पाहू इच्छिते.**

जो फक्त माझ्या घरासाठी आणि देशासाठी नाही तर सर्व देशांसाठी शांतता पाहू इच्छितो. म्हणून पवित्र पैगंबर (स.), यांच्या शिकवणींचा मुख्य केंद्र हे आहे की एक महाशक्ति मला पाहत आहे, ज्यासाठी मला माझी उक्ती व कृती एकसमान करावी लागेल. **नेहमी या तत्त्वाचे पालन करण्यासाठी पैगंबरांनी आखलेल्या सुवर्ण सिद्धांत की, इतरांसाठी तेच निवडा जे आपल्यासाठी निवडतात, हे आपल्यासमोर ठेवले**

**पाहिजे**. म्हणून हे तत्व समोर ठेऊन नेहमी असा विचार केला पाहिजे की जर मला फक्त माझ्यासाठी किंवा माझ्या राष्ट्रासाठी किंवा फक्त माझ्या देशासाठी शांती हवी असेल तर अशा वेळी मला अल्लाहकडून सहाय्यता कधीही साध्य होऊ शकत नाही.

**जेव्हा एखादी व्यक्ती अल्लाहची मर्जी संपादन करण्याच्या उद्देशाने कार्य करते तेव्हा अस्सल शांतता स्थापित होऊ शकते, अन्यथा नाही.**

म्हणून अल्लाहने पवित्र पैगंबराद्वारे आम्हाला कळविले,

اَلْمَلِكُ الْقُدُّوْسُ السَّلٰمُ الْمُؤْمِنُ,

(अल-हशर:२४)

तो सम्राट आहे. तो पवित्र आहे आणि इतरांना शुद्ध करतो. तो स्वतः सर्व दोषांपासून सुरक्षित असतो, तो इतरांना सुरक्षित ठेवतो. तो सर्वांना शांती देणारा आहे. असे सांगून अल्-मलिक, अल्-कुदुस अस्-सलाम, अल्-मुमिनन, मानवी हेतू शुद्ध केले आहेत आणि हे निश्चित आहे की जोपर्यंत हेतू योग्य नाहीत तोपर्यंत काम योग्य होऊ शकत नाही. हेतू स्पष्ट नसेल तर कामात कृपा कशी उत्पन्न होणार? जोपर्यंत हेतू योग्य होत नाहीत तोपर्यंत काम कधीच योग्य होऊ शकत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

**जगात सध्या जे काही अत्याचार आणि विध्वंस चालू आहेत, त्यामागचे कारण एवढेच की मानवाचे हेतू अनुचित आहेत.** लोक तोंडाने जे बोलतात त्यानुसार त्यांच्या इच्छा नसतात आणि त्यांची उक्ती आणि कृती त्यांच्या इच्छेशी जुळत नाही आणि जगातील या भ्रष्टाचारात तथाकथित मोठ्या आणि विकसित राष्ट्रांचा मोठा हात

आहे. आज जग लढण्याला नक्कीच वाईट म्हणते. प्रत्येक नेत्याचे हे विधान असते की लढणे ही वाईट गोष्ट आहे, पण त्याचा अर्थ एवढाच आहे की जर कोणी आमच्याविरुद्ध लढले तर ते वाईट आहे, परंतु जर त्यांच्याकडून युद्ध सुरू झाले तर ती वाईट गोष्ट नाही आणि हे दोष यामुळे कारण 'सलाम' अर्थात 'शांतता प्रदान करणाऱ्या' अस्तित्वावर या लोकांची नजर नाही, त्यावर विश्वास नाही. आपल्या हिताचे असेल तर आपण शांततेची घोषणाबाजी करू, पण जेव्हा आपल्या हिताच्या विरोधात येईल तेव्हा तो नाकारू, असे त्यांना वाटते. जर कोणी आपल्या शत्रूला मदत करत असेल आणि त्याला शस्त्रे दिली तर ते कोणत्याही प्रकारे मान्य नाही, परंतु जर आपण एखाद्याला शस्त्र दिले, तरीही त्याचा वापर अत्याचारासाठी केला जात असेल तर ते मान्य आहे. अशी विचारधारा आरूढ झाली तर खरी शांतता कशी प्रस्थापित होईल?

**म्हणून जगात खरी शांतता प्रस्थापित करण्यासाठी हा विश्वास आणि कृती प्रभावी ठरेल की या जगाचा एकमेव विधाता आहे जो सर्वांना शांतीपूर्ण पाहू इच्छितो.** आणि जेव्हा हा विश्वास निर्माण होईल, त्यावर पालन केले जाईल, तेव्हाच स्वार्थाची भावना संपुष्टात येईल आणि सर्वसामान्य व्यक्तिंना लाभान्वित करण्याची तडफ निर्माण होईल. आणि जेव्हा हे घडेल, तेव्हा शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी नवीन मानके दिसतील. या गोष्टीचा आपल्याला फायदा होते की नाही हे विचार करण्याऐवजी, त्याचा संपूर्ण जगावर काय परिणाम होतो हे आपण पाहणारे होतील. जगातील लोक नेहमी स्वतःच्या फायद्यासाठी इतरांची शांती नष्ट करतात, परंतु ज्यांना विश्वास

आहे की एक सर्वोच्च अस्तित्व आहे, ते कधीच हिम्मत करणार नाहीत, कारण त्यांना माहित आहे की जर आपण असे केले तर एक महाशक्ति आम्हाला ठेचून मारतील. म्हणून, **खरी शांती तोपर्यंत प्रस्थापित होऊ शकत नाही जोपर्यंत परमात्म्याचा स्वीकार होत नाही, आणि त्याचे प्रेम हृदयात उत्पन्न होत नाही आणि सर्वशक्तिमान अल्लाह शांती प्रदान करणारा आहे, हा विश्वास फक्त इस्लाम धर्मानेच पैगंबर मुहम्मद (स.) द्वारे सादर केलं आहे.**

सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर जी शिकवण अवतरीत केली होती त्यामध्ये असे सांगण्यात आले की,

قَدْ جَآءَكُمْ رَسُوْلُنَا يُبَيِّنُ لَكُمْ كَثِيْرًا مِّمَّا كُنْتُمْ تُخْفُوْنَ مِنَ الْكِتٰبِ وَيَعْفُوْا عَنْ كَثِيْرٍ قَدْ جَآءَكُمْ مِّنَ اللّٰهِ نُوْرٌ وَّكِتٰبٌ مُّبِيْنٌ يَّهْدِىْ بِهِ اللّٰهُ مَنِ اتَّبَعَ رِضْوَانَهٗ سُبُلَ السَّلٰمِ

अर्थात-अल्लाहकडून खरोखरच तुमच्याकडे एक प्रकाश आणि उज्जवल ग्रंथ आलेला आहे. त्याद्वारे अल्लाह त्यांची अनुकृपा इच्छिणाऱ्या लोकांना शांतीचे मार्ग दाखवतो. (अल् माइदाः१६-१७) म्हणून सर्वशक्तिमान अल्लाहने मार्गदर्शनाचा प्रकाश पाठविला, त्याने सर्व आदेशांसह एक पुस्तक देखील पाठवले आणि त्यात त्याने सुरक्षिततेच्या मार्गांबद्दल स्पष्ट सूचना देखील स्पष्ट केल्या. आता जे त्याचे तंतोतंत पालन करतील तेच सुरक्षिततेचे मार्ग शोधतील. जर आज मुस्लिमांमध्ये देशद्रोह आणि भ्रष्टाचाराची स्थिती आहे, आपापसात युद्धाची परिस्थिती आहे, तर हे स्पष्ट आहे की ते अल्लाहने दिलेल्या ग्रंथाचे आणि प्रकाशाचे खरोखर पालन करत नाहीत. जरी, असे दावे आहेत की आम्ही अल्लाहच्या संदेष्ट्यावर प्रेम

करतो, परंतु त्यांच्या कृती, त्याविरुद्ध आहेत. सर्वशक्तिमान अल्लाहचा शब्द कधीही चुकीचा असू शकत नाही. पवित्र पैगंबरांचे बोल देखील चुकीचे असू शकत नाही.

**जर मुस्लिमांमध्ये भ्रष्टता आणि उपद्रव दिसत आहे तर याचे एकमेव कारण हेच की ज्या धर्मग्रंथावर ते अंमल करण्याचा दावा करतात; खरे पाहिले तर ते त्यावर अंमल करत नाहीत. पवित्र पैगंबराशी प्रेम बाळगण्याचा दावा तर करतात पण त्यांची आज्ञापालन करत नाहीत.** त्यामुळे आज या शिक्षणाला आपल्या जीवनाचा भाग बनवणे हे पवित्र पैगंबर(स). चे सच्चे गुलाम यांच्या अनुयायांचे कार्य आहे. जर तुम्ही पवित्र कुरआनच्या आदेशाचे पालन केले तर तुम्ही तुमच्या वातावरणात शांतता निर्माण करू शकता आणि जगाला शांतीचा संदेश देऊ शकता.

हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात: आता आकाशाखाली एकच संदेष्टा आणि एकच ग्रंथ आहे, ते म्हणजे हजरत मुहम्मद मुस्तफा(स.), जे सर्वोच्च आणि सर्व संदेष्ट्यांमध्ये सर्वोत्कृष्ट, सर्व संदेशवाहकांमध्ये सर्वात परिपूर्ण, सर्वोत्कृष्ट प्रेषित आणि लोकांपैकी उच्चतम आहेत, ज्यांचे अनुसरण करून सर्वशक्तिमान परमेश्वर प्राप्त होतो आणि अंधाराचे पडदे उठतात आणि या जगात खऱ्या मोक्षाची चिन्हे प्रदर्शित होतात, आणि पवित्र कुरआन, ज्यामध्ये सत्य आणि परिपूर्ण सूचना आणि परिणाम आहेत, ज्याद्वारे सत्यज्ञान आणि विवेक प्राप्त केले जाते. आणि हृदय मानवी प्रदूषणापासून शुद्ध होते आणि माणूस अज्ञान, निष्काळजीपणा आणि शंकांचे पडद्यापासून मुक्त होऊन मोक्षाच्या स्थानापर्यंत पोहोचतो.

(तळटीप बराहीन-ए-अहमदिया, रुहानी खजाईन खंड १ पृष्ठ ५५७-५५८)

म्हणून **सर्वशक्तिमान अल्लाहने आपला प्रकाश म्हणजे हजरत मुहम्मद मुस्तफा, (स.) आणि पवित्र कुरआन, जो उज्ज्वल ग्रंथ आणि सर्वांचा स्त्रोत आहे पाठवून मानवतेवर मोठा उपकार केला आहे. जर मानवाने त्याचा फायदा घेतला नाही आणि आपल्या विध्वंसक स्वार्थाच्या कैदेत राहिला, तर त्यापेक्षा मोठा दुर्दैवी काय असू शकते.**

म्हणून, जर आपल्याला आपले जग आणि आपले नशीब सजवायचे असेल, शांतता आणि सुरक्षिततेने जगायचे असेल, तर आपण सर्वशक्तिमान अल्लाहचे हे वचन नेहमी आपल्यासमोर ठेवले पाहिजे, जे पैगंबर (स.) यांच्यावर अवतरले होते, की

يَهۡدِيۡ بِهِ اللّٰهُ مَنِ اتَّبَعَ رِضۡوَانَهٗ سُبُلَ السَّلٰمِ

हे प्रबोधनपर पुस्तकाचे वचन नेहमी समोर ठेवावे, तेव्हाच शांततेच्या मार्गावर पदक्रमण करतील आणि सुरक्षिततेच्या मार्गावर असतील. या ग्रंथात एकही असा आदेश नाही जो की मानवतेच्या शांततेला भंग करणारा असेल. तर हाच तो संदेश आहे जो आज घराण्याला आणि इतरांना पोहोचवणे हे आमचे कर्तव्य आहे. आणि हीच जगात शांततेची हमी आहे. आणि हीच क्रांती होती जी पवित्र पैगंबर (स.) यांनी त्यांच्या साथीदारांमध्ये निर्माण केली आणि व्यावहारिकरित्या असा एक गट तयार केला ज्याने

اِذَا خَاطَبَهُمُ الۡجٰهِلُوۡنَ قَالُوۡا سَلٰمًا

(अल-फुरकान: ६४)

आणि जेव्हा अज्ञानी त्यांना संबोधित करायचे तेव्हा ते सलाम म्हणायचे, याचे प्रमाणिक उदाहरण बनवले आणि हीच ती स्थिती आहे की जर

आपल्यात निर्माण झाली आणि मग ती जगभरात आम्ही निर्माण केली तेव्हा आमचा वर्तमान देखील शांतीमय असेल आणि भविष्य देखील शांतीपूर्ण असेल.

म्हूणन हजरत अपेक्षित मसीहच्या अनुयायांसाठी हे एक मोठे कार्य आहे ज्यांनी त्यांच्या घरात आणि वातावरणात शांतता आणि सुरक्षितता निर्माण करायची आहे आणि मग जगात शांतता आणि सुरक्षितता निर्माण करायची आहे. आणि हे कार्य तेव्हा केले जाईल जेव्हा आपले अंतःकरण शुद्ध एकेश्वरवादाने भरले जाईल आणि जगाला खऱ्या एकेश्वरवादाकडे आणेल. **अस्सल एकेश्वरवादाच्या स्थापनेशिवाय शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही, हे निश्चित आहे.** आधी सांगितले गेले आहे की परमात्माच्या अस्तित्वाचे स्वीकार करणे अपरिहार्य आहे आणि तो **परमात्मा सर्वशक्तिमान अल्लाह** आहे आणि त्याची कल्पना, एकेश्वरवाद हृदयात स्थापित केल्याशिवाय येऊ शकत नाही आणि जर एकेश्वरवाद स्थापित झाले नाही तर युद्ध चालू राहतील. युद्ध तर तेव्हाच संपुष्टात येतील जेव्हा खऱ्या अर्थात परस्पर प्रेम, आपुलकी आणि बंधुभाव निर्माण होईल.

**आणि जोपर्यंत लोकांमध्ये खरी एकता निर्माण होत नाही तोपर्यंत शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही आणि एका विधात्यावर विश्वास ठेवल्याशिवाय खरी एकता निर्माण होऊ शकत नाही.** ईश्वराशी संबंध असल्याशिवाय एकता आणि एकोपा निर्माण होऊ शकत नाही. हे केवळ विश्वास ठेवण्यासाठी नाही तर नातेसंबंध प्रस्थापित करण्यासाठी देखील आहे आणि आम्हाला हे शिक्षण देखील पैगंबर, शांती आणि आशीर्वाद यांच्याद्वारे मिळाले आहे. म्हणून, जेव्हा

सर्वशक्तिमान अल्लाहने आम्हाला اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ (अर्थात-सर्व स्तुतीचा अधिकारी अल्लाह हाच आहे जो सर्व जगांचा विधाता आहे),ची शिकवण पवित्र कुरआनद्वारे दिली, तेव्हा त्याने आम्हाला प्रत्येक प्रार्थनेत ते वाचण्याचा आदेश देखील दिला, जेणेकरून त्याची व्यापक संकल्पना मुस्लिमांमध्ये बंधुभाव प्रस्थापित झाली. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ असे पठण केल्याने, संपूर्ण जगावरील सर्वशक्तिमान देवाच्या सार्वभौमत्वाची समज निर्माण होते. हे शब्द वाचून माणसाच्या विचाराचा विस्तार होतो आणि तो सर्व जगाचा आणि विश्वाचा स्वामी असलेल्या ईश्वराची स्तुती करतो. जो ख्रिश्चनांचा प्रभु आहे, हिंदूंचा प्रभु आहे, ज्यूंचा प्रभु आहे आणि सर्वांचा प्रभु आहे. जेव्हा एखादी व्यक्ती हे शब्द वाचते, तेव्हा एखाद्याबद्दल द्वेष कसा होऊ शकतो? मी एकदा अमेरिकेत एका सभेत बिगर मुस्लिमांना हे समजावून सांगितल्यावर ते म्हणाले, ''ही किती सुंदर शिकवण आहे!'' आणि खरंच, इस्लामची शिकवण अशी आहे की ती खऱ्या मुस्लिमाच्या मनात कधीही दुसऱ्याबद्दल द्वेष निर्माण करू शकत नाही. रब्बुल आलामीनच्या शब्दांनी सर्व काही व्यापले आहे आणि यामुळे शांतता पसरवण्याचे विस्तृत मार्ग खुले होतात. असे اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ मध्ये सांगण्यात आले आहे, की **जर खरा एकेश्वरवाद प्रस्थापित झाला आणि माणसाची जीभ जगाच्या परमेश्वराच्या स्तुतीने व्यापलेली असेल, तर माणसाच्या हृदयात राष्ट्रद्वेष असणे शक्य नाही. ख्रिश्चनांसाठी नाही, हिंदूंसाठी नाही, ज्यूंसाठी नाही.**

हे कसे असू शकते की एकीकडे तो त्यांचा नाश करू इच्छितो आणि दुसरीकडे तो त्यांना पाहून अल्लाहची स्तुती करतो. हे होऊ

शकत नाही. तर, खरा एकेश्वरवादी, हा खरा शांतता आणि सुरक्षिततेचा वाहक आहे. जर मुस्लिमांनी खरोखरच हा मुद्दा समजून घेतला आणि त्यानुसार त्यांचे जीवन जुळवून घेतले, तर जगभरात शांतता नांदेल; परंतु परत तीच गोष्ट लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे की, **पवित्र पैगंबर (स.) यांच्या खऱ्या समर्पित दासाशी जुडणे साधणे देखील महत्त्वाचे आहे. तरच ब्रह्मज्ञानाचे योग्य आकलन होऊ शकते.** पण त्याच वेळी, मी पुन्हा म्हणेन की आपल्या परिस्थितीचे मूल्यमापन करत राहण्याची जबाबदारी देखील आम्हांवर आहे. आपल्या प्रार्थनेतील **اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ**चे पठण हे केवळ तोंडी नसावे तर अंतःकरण त्याच्यापासून भरलेले असावे. जर हृदय आणि मन या खोलीपासून रिकामे असेल, तर आपण देखील संकटे आणि दुरावा निर्माण करणाऱ्यांमध्ये असू. जे शांतता आणि सुरक्षितता पसरवतात आणि पवित्र प्रेषितांना दिलेल्या शिकवणींचे पालन करतात त्यांच्यापैकी ते नसतील.

त्यामुळे खूप विचार करा, खूप काळजी घ्या. आज, जगात खरी शांतता आणि सुरक्षितता निर्माण करण्यासाठी एक ईश्वरावरील विश्वास दृढ करणे हे प्रत्येक अहमदीचे कार्य आहे. देव त्यांच्या अंतःकरणात प्रेम स्थापित करो जेणेकरून दुसरे प्रेम त्याची जागा घेऊ नये. त्याच्या आदेशांचे पालन करण्यासाठी, पवित्र प्रेषितांवर प्रकट केलेल्या शिकवणी, म्हणजे पवित्र कुरआन, याला जीवनाचा एक भाग बनवा. जेव्हा आपला दर्जा इतपर्यंत पोहोचतील की पवित्र कुरआनची प्रत्येक आज्ञा आणि पवित्र पैगंबरांचे प्रत्येक वचन आपल्या शब्द आणि कृतीचा भाग बनतील, तेव्हाच आपण इस्लामचा खरा संदेश जगापर्यंत पोहोचवू

शकू. त्यांना खऱ्या शांततेचा मार्ग तर शिकवला जाईलच, पण शब्दातून नव्हे तर कृतीतून, आणि हेच जगात खरी शांती प्रस्थापित करण्याचे साधन आहे, आणि हेच पैगंबरांना शांततेचे महान अस्तित्व सिद्ध करण्याचे साधन आहे. इस्लामवर आक्षेप घेणाऱ्यांची तोंडे बंद करण्याचा हा प्रकार आहे. **आज हे काम अपेक्षित मसीहच्या जमाअतला सोपवण्यात आले आहे. जरी आम्ही देशांतर्गत पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत आपली भूमिका त्यानुसार मांडली नाही तर आमची शांती आणि सुरक्षिततेची हमी देखील बाकी राहणार नाही.** तसेच आपल्या पिढ्या शांततेत आणि सुरक्षिततेने जगतील अशी कोणतीही हमी नाही आणि जगाच्या शांततेची आणि सुरक्षिततेची कोणतीही हमी नाही. सर्वशक्तिमान अल्लाह आम्हाला जगातील अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे साधन बनवो. सर्वशक्तिमान अल्लाह आम्हाला आमचे कर्तव्य उत्तम प्रकारे पार पाडण्याचे सामर्थ्य देवो.

**आम्ही आता प्रार्थना करू.**

प्रार्थनेत, प्रत्येकाने प्रार्थना करा की सर्वशक्तिमान अल्लाह या वार्षिक सम्मेलनाला खूप खूप आशीर्वाद देवो आणि प्रत्येकाला अपेक्षित मसीहांच्या प्रार्थनांचे वारसदार बनवो. शक्य तितक्या लवकर जागतिक परिस्थितीत शांतता आणि सुरक्षितता प्रदान करो जेणेकरुन आम्ही आमच्या सभा पुन्हा मोठ्या प्रमाणावर आणि त्याच गौरवाने सर्व प्रकारच्या चिंतांपासून मुक्त होऊन आयोजि करू शकू आणि सभांना आमची आध्यात्मिक आणि शैक्षणिक तहान शमवण्याचे साधन बनवू शकू. आणि खऱ्या अर्थाने आम्ही इस्लामी शिकवणींनुसार आपले जीवन व्यतित करणारे होवो. आम्ही अल्लाहच्या प्रेमाचे आणि कृपेचे

प्राप्तकरणारे होवो. अल्लाह आम्हाला याचे सामर्थ्य प्रदान करो. आता प्रार्थना करा.

प्रार्थनेनंतर हुजूर अनवर म्हणाले: जर्मनी सम्मेलनाची एकूण संख्या ऐका आणि मग नारेबाजी करा. या सम्मेलनाची एकूण उपस्थिती एकोणीस हजार सातशे दोन आहे, ज्यामध्ये महिला नऊ हजार चारशे दोन आणि पुरुष दहा हजार तीनशे आहेत. याव्यतिरिक्त इतर माध्यमांद्वारे सम्मेलनाची कारवाही ऐकणाऱ्यांची संख्या चाळीस हजारांच्या वर आहे. यानंतर पुढचा कार्यक्रम सुरू करा.

(अल-फजल इंटरनॅशनल, सप्टेंबर २७, २०२२, पृष्ठ ६-१०)